# फळसेवाडी हितकारी संस्था
## कार्यकारीणी सभा

**दिनांक** : शनिवार 07 डिसेंबर 2013
**स्थळ** : 14 कर्मचारी निवास, शहाजीराजे भोसले क्रिडा संकुल, अंधेरी – पूर्व, मुंबई – 400 053

उपस्थिती

| | |
|---|---|
| 1. श्री सुनिल सदानंद राणे | 6. श्री शंकर बाळकृष्ण राणे |
| 2. श्री पांडूरंग सावजी राणे | 7. श्री जयवंत नाना राणे |
| 3. श्री मधुसूदन श्रीधर राणे | 8. श्री विश्वनाथ दिनकर राणे |
| 4. श्री मंगेश मनोहर राणे | 9. श्री दशरथ दत्ताराम साटम |
| 5. श्री उदय भगवान राणे | |

फळसेवाडी-टेंबवाडी याची सभा क्रिडा संकुल येथे श्री मंगेश मनोहर राणे यांच्या कार्यालयात घेण्यात आली. सभेस वरील सभासद उपस्थित होते.

फळसेवाडी-टेंबवाडी ग्रामस्थ यांची सभा शनिवार दिनांक 7 डिसेंबर 2013 रोजी श्री मंगेश मनोहर राणे यांच्या कार्यालयात पार पडली. सभेस एकूण 9 ग्रामस्थ उपस्थित होते. सभेच्या ठिकाणी अध्यक्षांच्या वतीने सर्वांचे स्वागत करण्यात आले.

त्यानंतर सभेस सुरवात झाली. चिटणीसांनी वाडीतील रस्त्याबद्दल संपूर्ण माहीती दिली व अंदाजित खर्चाबद्दल माहीती दिली. तो जवळजवळ रु.1.25 लाख एवढा होता. परंतू काम सुरू केल्यानंतर तुटलेली कंपाऊन्ड बांधणे, फुटलेल्या पाण्याचे पाईप दुरुस्ती आदी खर्च धरून तो रु.2.25 लाखापर्यंत गेल्याबद्दल श्री रत्नाकर नाना राणे यांचेकडून मोबाईलवरून माहीती घेण्यात आली व खर्चाच्या पूर्ततेबद्दल चर्चा झाली.

श्री रत्नाकर नाना राणे यांनी असे सांगितले की श्री आनंद नारायण साटम यांच्या घराजवळील घळण दुरुस्ती, श्री मधुसूदन श्रीधर राणे यांच्या घराकडील बांध (3 फूट रुंद), पाणी पाईप लाईन दुरुस्ती व इतर छोटी कामे यामुळे हा खर्च रु.1.25 लाखापासून वाढून रु.2.25 लाख वाढला आहे. श्री रत्नाकर नाना राणे यांनी पुढे सांगितले की हा रस्ता मी माझ्या देखरेखी खाली डिसेंबर 2013 पर्यंत पूर्ण करणार आहे. तसेच ग्रामपंचायत (नमूना 26) प्रमाणे पुढील कारवाईसाठी प्रयत्न करत आहे. ते देखील काम पूर्ण होईल व ग्रामपंचायत नमूना 26 प्रमाणे झाल्यास रस्त्याचे खडीकरण व डांबरीकरण करण्यास सोपे जाईल व ते मी करणार आहे अशी ग्वाही दिली.

श्री दशरथ दत्ताराम साटम यांनी असे सुचविले की रस्त्याचे घेतलेले काम पूर्ण करणे आता गरजेचे आहे त्यानुसार मी मान्य केल्याप्रमाणे रु.25,000/- पहिला हप्ता दिला आहे पुढे 15 डिसेंबर 2013 पर्यंत रु.50,000/- ची तरतूद करतो. त्यामुळे पुढे कमी पडणारे रु.39,000/- एवढे विहीर फंडातून देण्याचे ठरले.

विहीरीबाबत श्री रत्नाकर नाना राणे यांनी सांगितल्याप्रमाणे टेंब विहीर ही आता ज्या ठिकाणी पाणी मिळाले आहे त्यातून बोअर मारून नळपाणी योजना करण्याचे ठरले.

खर्चाची तोंडमिळवणी

| | |
|---|---|
| श्री विरेन्द्र अनंत राणे | रु.111,000/- |
| श्री दशरथ दत्ताराम साटम | रु. 75,000/- |
| विहीरफंडातून | रु. 39,000/- |
| **एकूण खर्च** | **रु.225,000/-** |

वरील खर्चास मान्यता देण्यात आली व हे पैसे श्री रत्नाकर नाना राणे यांस ट्रान्सफर करण्याचे ठरले.

सचिव श्री सुनिल सदानंद राणे यांनी ब्राह्मण विहीर दुरुस्ती श्री सचिन झिलू राणे करणार आहेत असे सांगितले.

ही बैठक खेळीमेळीच्या वातावरणात पार पडली. या कार्यक्रमाचा चहापाणी खर्च श्री मंगेश मनोहर राणे यांनी केल्याबद्दल त्यांचे आभार मानण्यात आले.

---